जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०१.०९.२०२५**

''०४ अग्निशस्त्रे व ०८ काडतुसे विक्रीकरिता आलेल्या तीन इसमांना अटक खंडणी विरोधी पथकाची उल्लेखनीय कामगिरी''

सध्या सुरू असलेला गणेशोत्सव तसेच अगामी ईद–ए–मिलाद इ. सण–उत्सव कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहुन कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडण्याच्या पार्श्वभुमीवर मा.पोलीस आयुक्त सो ठाणे शहर यांनी गुन्हे शाखेच्या पथकांना अवैध शस्त्र खरेदी विक्री करणाऱ्या, अंमली पदार्थाचा व्यापार करणाऱ्या तसेच इतर अवैध धंदे करणाऱ्या जास्तीत जास्त इसमां विरूध्द सक्त कारवाई करण्याबाबत सक्त आदेश दिले होते. सदर आदेशाची अंमलबाजवणी करण्यांच्या व कारवाई करण्याच्या अनुषंगाने गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळवीत असताना दि.३०/०८/२०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेश साळवी, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी बातमी मिळाली की, '' दि.३०/०८/२०२५ रोजी पहाटेच्या सुमरास इसम नामे आकाश व त्याचे दोन मित्र अक्षय व बिट्टु हे कल्याण स्टेशन परिसरात अग्नीशस्त्र व काडतुसे कोणाला तरी विक्री करण्याकरिता येणार आहेत.

सदर मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेश साळवी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक, सचिन कुंभार यांनी कल्याण रेल्वेस्टेशन परिसरात सापळा रचला असता **१) अक्षय नथनी सहानी, वय २० वर्षे**, व्यवसाय–शिक्षण, रा.उत्तर दिल्ली, **२) बिंटु धरमविरसिंग गौर, वय २६ वर्षे,** रा.उत्तर प्रदेश, **३) आकाश दुर्गाप्रसाद वर्मा, वय २३ वर्षे,** रा. सेंट्रल दिल्ली, हे त्याचे ताब्यात **२ देशी बनावटीचे पिस्टल, २ देशी कट्टे, ८ जिवंत काडतुसे असा एकूण १,८२,५००/–रू.** किमतीचा मुददेमाल अवैधरित्या विक्री करण्याचे इरादयाने बेकायदेशीररित्या विनापरवाना आपले कब्जात बाळगुन मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयाचे हददीत घातक शस्त्रे बाळगण्यास मनाई असल्याबाबत काढलेल्या आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आले आहेत. त्यांच्याविरूध्द **महात्मा फुले चौक, पोलीस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा रजि.नंबर ।९५२/२०२५ शस्त्र अधिनीयम १९५९ चे कलम ३, २५ सह, महा.पो.का. कलम ३७(१), १३५,सह भा.न्या.स. २०२३ चे कलम ३(५)** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना सदर गुन्हयात लागलीच अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीची दि.०४/०९/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सुभाष तावडे, खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा ठाणे शहर करीत आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त(गुन्हे), श्री.विनय घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त शोध–२, गुन्हे शाखा, यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील वपोनि/शैलेश साळवी, सपोनि/सुनिल तारमळे, पोउनि/सचिन कुंभार, पोउनि/सुभाष तावडे, पोहवा/१८३४ शैलेश शिंदे, पो.हवा. ४०४० आशिष ठाकुर, पो.हवा.४१८४ संजय राठोड, पो.हवा.१०१५/राजाराम पाटील, पो.हवा.१५१०/अभिजीत गायकवाड, पो.हवा./२७० सचिन जाधव, पोना/७०७९ /सुमित मधाळे, पोना/१९२५रविंद्र संभाजी हासे, चापोहवा./७३१२ भगवान हिवरे, म. पो.हवा.४४६६/ शितल पावसकर, पो.हवा.१४०३/सतिश सपकाळे, पो.ना./१९१५ रविंद्र हासे,पोशि/८२४६ विनोद ढाकणे, पोशि/२६४०/तानाजी पाटील, पो.शि./३२१३ संतोष वायकर पोशि/१९८४ अरविंद शेजवळ यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर